दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे   सपादक बडूभाऊ इगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ मंगळवार दि. 30 सप्टेंबर 2025 ■ वर्ष : 2 रे ■ अंक : 150 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## आई रेणुका मातेला निळ्या महावस्त्रामध्ये अंबाबाईचा देखणा अविष्कार

महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे
तालुका प्रतिनिधी माहूर

साडेतिन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या माहूरगडावर शारदीय नवरात्र महोत्सव उत्साहात सुरू आहे. आज सप्तमी व दुपारनंतर अष्टमीचा शुभयोग आल्याने घटास माळ अर्पण करण्यात आली. या विशेष प्रसंगी आई श्री रेणुका मातेस निळ्या रंगाचे महावस्त्र परिधान करून फुलांची आरास, पुरातन अलंकार, पायास नैवेद्य, विडा-तांबूल अर्पण करण्यात आले. त्यानंतर महाआरती पार पडली. मातेच्या दरबारात कुमारिका पूजन विधीही भक्तिभावाने संपन्न झाला. यावेळी श्री रेणुकादेवी संस्थानचे पुजारी मंडळ उपस्थित होते.आज दिवसभरात रसिक कलाकारांनी भक्तिगीत, कीर्तन व सेवा अर्पण करून सभोवतालचे वातावरण दैवी मंगलमय केले.दरम्यान, श्री रेणुका देवी संस्थानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन दहा दिवस सुरू असते. महाप्रसादाची संपूर्ण जबाबदारी अरुण घोडेकर, आकाश वानखेडे, संदीप जामोदकर तसेच सुरक्षा रक्षक राजू कराळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. भाविकांना महाप्रसादाचे नियोजित ठिकाण स्वच्छ व नीटनेटके असल्याचा अनुभव मिळाला. यामध्ये फराळ व भोजनासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.आज सोमवार असल्याने सकाळच्या सत्रात भाविकांची गर्दी थोडी ओसरली होती. परंतु दुपारनंतर पावसाला विश्रांती मिळताच भाविकांनी गडावर मोठ्या संख्येने हजेरी लावली व आई रेणुका मातेच्या दर्शनाचा लाभ घेतला




# दसरा मेळाव्यावरून भाजप, उद्धवसेनेत जुंपली

## दसरा मेळावा रद्द करण्याच्या भाजपच्या मागणीवर उद्धवसेनेचा हल्लाबोल




मुंबई : शिवाजीपार्क येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यावरून भाजप व उद्धवसेनेत जुंपली आहे. भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी दसरा मेळावा रद्द करून होणारा खर्च पूरग्रस्तांसाठी देण्याचा सल्ला उद्धवसेनेला दिला. त्यावर उद्धवसेनेचे आ. महेश सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहिरातींवर केलेला लाखो रुपयांचा खर्च पूरग्रस्तांना द्या, असे सांगत पलटवार केला. मुख्यमंत्री असताना कृती न करता घरात बसून राहिले त्याचे प्रायश्चित्त घेण्याची वेळ आली आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे दसरा मेळाव्यात विचारांचे सोने लुटायचे. पण, आता नुसता थयथयाट असेल. सामान्य कार्यकर्त्याला भुर्दंड पाडून लाखोंचा खर्च करण्यापेक्षा मेळावा रद्द करून तो खर्च पूरग्रस्तांना द्या, असा टोला उपाध्ये यांनी लगावला. उपाध्ये यांच्या टीकेला उत्तर देताना आ. सावंत यांनी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या जाहिराती लावल्या. त्यावर खर्च करण्याऐवजी भाजपने पूरग्रस्तांना मदत द्यायला हवी होती. पूरग्रस्तांना आमची मदत सुरू असून ती आ. कैलास पाटील व खा. ओमराजे निंबाळकर यांच्याकडे देत आहोत, असा पलटवार केला. शिवतीर्थावर होणारा दसरा मेळावा ही आमची परंपरा आहे. सीमेवर लढताना सैनिक वारा-वादळ काही बघत नाही. वाघ बंदिस्त ठिकाणी नव्हे तर जंगलात, मैदानात फिरतात. विभाग प्रमुखांच्या बैठकीत प्रत्येकाला जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे काही झाले तरी मेळावा होणारच, असेही आ. सावंत यांनी सांगितले.

# नवसाला पावणारी - उपशक्तीपीठ भामदेवीची जगदंबा माता दर्शनाला भाविकाची तुफान गर्दी

कारंजा / प्रतिनिधी

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या ग्राम भामदेवी येथील जगदंबा मातेचे मंदिर हे भामदेवीचे आराध्य दैवत म्हणुन प्रसिद्ध आहे. हे मंदिर महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या साडे तीन पीठांपैकी माहूरच्या रेणुका मातेचे उपशक्ती पीठ म्हणुन ओळखले जाते. यां मंदिरात असलेल्या देवीला मोठा इतिहास असून पुरातन काळातील मंदिर असल्याने परिसरातील लोकांची मोठी श्रद्धा आहे यां श्रद्हेने लोक नवरात्रात दर्शनासाठी येतात मंदिर प्रशासनाकडून पूरविन्यात येत असलेल्या सोई सुविधे मुळे परिसरातील भक्त गणं वाढले असून यावर्षी दर्शन साठी भाविकांची मोठी गर्दी पाहावायस मिळते आहे. भक्ताची भामदेवीचे जगदंबा माता या मंदिर ५०० ते ७०० वर्षापूर्वी चे हेमाडपंथी काळातील आहे. मंदिरात देवीची स्वयंभूतीन फूट खोल मूर्ती आहे. मंदिराबाबत एक आख्यायिका आहे की, भाम गावात राहणाऱ्या एका भक्ताच्या अपार श्रद्धेमुळे आई जगदंबा पिंपळाच्या झाडाजवळ एका खताच्या झाली. तेव्हापासून आजही आई ढिगाऱ्यातून गावात प्रकट झाली. खताच्या ढिगाऱ्यातून निघणारी आई स्तिथीमध्ये तसाच स्तब्ध हेमाडपंथी काळात मंदिराची स्थापना झाली सोहळा पुरायण काळातील देवीची

> आश्विन नवरात्र उत्सव उद्या मंगळवार दि ३०/०९/२०२५ रोजी भामदेवि येथे श्री जगदंबा देवी संस्थान मधे संध्याकाळी पाच वाजता अष्टमी ला होम पुजा सुरु होणार आहे होम पुजा रात्री दहा वाजेपर्यंत राहील दहा वाजुन तिस मिनीटांनी नवमीला आई जगदंबेची आरती होईल तरी सर्व भाविक भक्तांनी होम हवनाच्या दर्शनाचा लाभ घ्यावा हि विनंती
> **जगदंबा संस्थान ट्रस्ट जगदंबा महिला सेवेकरी**
> **जगदंबा नवयुवक मंडळ भामदेची यांनी केली आहे.**

मूर्ती आजतगायत त्याच स्थितीत असल्याचे सांगितले जाते. तेव्हापासून या गावाला भामदेवी नावाने ओळखले जाऊ लागले. मनोकामना पूर्ण करणारी जागृत देवी म्हणून भामदेवी येथील सस्थानाची ख्याती आहे. नवरात्रात नऊ दिवस जळतात अखंड दिप नवरात्रामध्ये नऊ दिवस अखंड दिप भक्तांकडून प्रज्वलित केली जाते. तसेच दररोज सकाळी शाश्वत पूजा, आरती, अभिषेक भोग आदी कार्यक्रम नित्य नियमाने पार पाडले जातात. तसेच नवमी ला होम हवन केले जाते ज्यामध्ये नवविवाहित जोडप्याचा समावेश असतो. नवरात्रात दूरवरून भक्त येथे दर्शनासाठी येतात, विवीध कार्यक्रमांनी जगदंबा देवीचा उत्साहात साजरा केला जातो. दर्शनासाठी पहाटे पासून लागते भाविकांची रीघ शारदीय नवरात्रात पहाटे पासून दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी पहायला मिळते. पहाटे ३ वाजतापासून पंचक्रोशीत शेकडो भाविकगण पायदळ भामदेवी येथे दर्शनासाठी येतात. श्री जगदंबा संस्थान, भामदेवी



# प्रतिक खडसे यांची उच्च शिक्षणासाठी निवड

**विशेष प्रतिनिधी : लखन लोंढे**
यवतमाळ :-



सविस्तर वृत्त असे की, प्रतिक खडसे यांची टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे. अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, बेंगलोर ची परीक्षा सुद्धा उत्तीर्ण झाले आहे. ते अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळी मध्ये काम करत आहे. खासदार अड. चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वात ते युवा अमरावती जिल्हाध्यक्ष जबाबदारी पार पडत आहे.या शैक्षणिक मार्गदर्शनासाठी निलेश शिंदे व सचिन गजभिये हे सुद्धा सहभागी असणार दोन्ही व्यक्ती TISS मुंबई व APU बेंगलोर ची परीक्षा उत्तीर्ण आहेत. उच्च शिक्षण्यासाठी प्रत्येक समुदायातील विद्यार्थीनी गेले पाहिजे. TISS, JNU दिल्ली,APU बेंगलोर आणि भारताबाहेरच्या विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक प्रशिक्षण ते देणार आहे. अमरावती येथील भीमटेकडी बुद्ध विहारामध्ये १५ ऑगस्ट २०२५ पासून ते या परीक्षांसाठी मोफत मार्गदर्शन करत आहे.एक नवीन शैक्षणिक क्रांती उभारण्याचा त्यांचा मानस आहे. महात्मा जोतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना प्रेरित होऊन त्यांनी हे शैक्षणिक काम करत आहे.अमरावती मधील सरकारी रुग्णालयात ज्या व्यक्तीची परिस्थिती नसते अशा व्यक्तींना ते रक्तदात्याची मदत करतात. समाजसेवेचा ध्यास त्यांनी घेतलेला आहे.

## मातृभूमी सोशल फाउंडेशन तर्फे उत्कृष्ट पत्रकारिता व सामाजिक कार्य राज्यस्तरीय पुरस्कार संतोष लांडे व कांताभाऊ राठोड यांना प्रदान

पुणे प्रतिनिधी श्याम जगताप

दिनांक 28 सप्टेंबर रोजी मातृभूमी स्पेशल फाउंडेशन च्या माध्यमातून पत्रकार भवन गांजवे चौक च्या शेजारी निवारा हॉल येथे पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील कर्तुत्वान मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .यावेळी अजिंक्य न्यूज चॅनलचे संपादक व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष लांडे व झेप फाउंडेशन पुणे (महाराष्ट्र राज्य) चे संस्थापक अध्यक्ष व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष कांताभाऊ राठोड यांचा उत्कृष्ट पत्रकारिता व सामाजिक कार्य राज्यस्तरीय पुरस्कार जगप्रसिद्ध मूर्तीशास्त्रज्ञ श्री .मा. गो.ब देगलूरकर सर यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे मुख्या अतिथी म्हणून गो.ब देगलूरकर सर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ.महेश थोरवे सर संचालक एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट पुणे ,मा . अँड .संग्राम नाथाभाऊ शेवाळे सदस्य युवा धोरण समिती महाराष्ट्र राज्य ,मा. श्री किरण बाळकृष्ण कदम सर संचालक किरण कंट्रक्शन ,मातृभूमी सोशल फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष अशोक पाटील साहेब, मा .सौ भारतीताई रमेश तुपे संस्थापक अध्यक्ष भारतीय नारी संघटना, मा . सौ श्रद्धाताई गोरक्ष परांडे सौ. श्रद्धाताई गोरक्ष ( आप्पा) परांडे जनहित मंच, मा .श्री सुनील सुरेश गोरे अध्यक्ष राष्ट्रभक्ती परिवार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे व अतिथी यांनी मार्गदर्शन केले . या पुरस्कारासाठी महाराष्ट्रभरातून विविध क्षेत्रातील पुरस्कार्थी उपस्थित होते वेगवेगळ्या क्षेत्रातील 50 पुरस्कार्थीना पुरस्कार देऊन यावेळी गौरवण्यात आले. पुरस्कार देण्यामागे अशोक पाटील सर यांचे असे मत आहे की पुरस्कार हा माणसाला अजून जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा देत व कशा परिस्थितीतून मात करून ध्येयापर्यंत पोहोचतात याची एक शीख, उदाहरण लोकांसमोर उभे राहते या कार्यक्रमाच्या शेवटी चहा ,नाष्टयाची सोय करण्यात आली होती

# नवरात्रोत्सवात श्री.आनंद दत्त धाम आश्रमाकडून हजारो भाविकांना अन्नदान

महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे
तालुका प्रतिनिधी माहूर

श्री.आनंद दत्त धामआश्रमाकडून नवरात्रोत्सव काळात भक्तगण,भाविक,पोलीस कर्मचारी आणि हजारो लोकांना दररोज अन्नदानाचा लाभ दिला जात आहे. आनंद दत्तधाम आश्रमाकडून आजपर्यंत अनेक उपक्रम आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन सुद्धा अनेक वर्षांपासून होते आहे. नवरात्रोत्सवात विजयादशमी ला व्यसन दहन , प्लास्टिक मुक्त,असो किंवा नगरभोजन असो आश्रम व आश्रमाचे मठाधिपती राष्ट्रसंत द.भ.प.साईनाथ महाराज वसमतकर हे सतत सेवेत सादर आहेत.

दरम्यान च्या काळात माहूर दर्शनासाठी येणारे भाविक तसेच कर्तव्यावर असणारे एस. टी. महामंडळाचे



कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी व जो येईल त्याला दत्तप्रसादाचा लाभ हा या आश्रमाकडून देण्यात येत आहे. आजचा तरुण झपाट्याने व्यसनात गुरफटत चालला आहे. जे पुढील काळासाठी अंधःकारमय आहे."बुडते हे जन देखवेना डोळा म्हणून कळवळा येतसे" या उक्तीनुसार महाराष्ट्र राज्याचे स्वच्छता दूत राष्ट्रसंत द.भ.प.सदगुरु साईनाथ महाराज वसमतकर यांनी समाज जागृतीचा वसा आपल्या शिरी घेतला आहे.भक्तीतून समृद्ध जीवनाकडे मानव जावा यासाठी आजवर अनेक उपक्रम श्री. आनंद दत्त धाम आश्रमाकडून घेण्यात आले आहेत.

आनंद दत्त धाम आश्रमाकडून आजपर्यंत अनेक विधायक उपक्रम माहूर नगरीत राबविण्यात आले आहेत. त्यात कोव्हिड काळात चालवलेले अन्नछत्र, दररोज हॉस्पिटल ला रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना जेवणाचे डबे पुरवणे,गरजूंना धान्य वाटप,लसीकरण,शिक्षण परिषद घेणे,शिष्यवृत्ती मार्ग दर्शन,वृक्षारोपण,स्वच्छतेबाबत जनजागृती,साहित्य संमेलन आयोजित करणे तसेच कीर्तन-भजनाच्या माध्यमातून समाजजागृती असे विविध उपक्रम राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांनी राबवले आहेत. त्याचबरोबर आटारी वाघा सिमेवर सैनिकांसाठी भक्ती व दत्त नामाचा महिमा कळावा यासाठी दत्त नाम सप्ताहाचे आयोजन व त्या माध्यमातून स्वच्छता,वृक्षारोपण. मानवतेचा संदेश त्यांनी दिला.विशेष म्हणजे अधिक मासात महिनाभर चुलबंद स्वादिष्ट नगर भोजन हे माहूरकर विसरणार नाहीत. या नवरात्रोत्सवात अन्नदानासाठी आश्रमाचे प्रवक्ते भाऊराव पाटील हडसणीकर, एस. एस. पाटील , जवाहरलाल जयस्वाल , मारोतराव रेकुलवार सरपंच लांजी,पुंडलिक हुम्बे, आशीर्वाद कदम, संतोष मते, बालाजी जाधव, राजू चुनाळकर, संजय तंबाके, गजानन मुकाडे, अंकुश भुजबळ, नागोराव जंगिलवाड , संभाजी बाभळे हे विशेष परिश्रम घेत आहेत.

# गोभणी येथे कृषी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

## प्रा.गुलाब साबळे - अभिव्यक्ती सामर्थ्य

वाशिम(प्रतिनिधी)

मौजे गोभणी येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम यांच्या संयुक्त विद्यमानाने शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास मा. प्रकल्प संचालक आत्मा, वाशिम श्रीमती अनिसा महाबळे मॅडम प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. बबनराव पाटील गारडे यांनी भूषविले. तसेच सहाय्यक कृषी अधिकारी श्री. मदन शिंदे, तज्ञ प्रशिक्षक श्री.संजय मांडवगडे, श्री. दुर्गादास खोडवे पोलीस पाटील गोभणी, सौ. विद्याताई सरोदे सरपंच ,संदीप घायाळ माजी सरपंच यांच्यासह गावातील मान्यवर व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख उपस्थितांमध्ये श्री प्रभाकर पाटील साबळे, रमेश नाना साबळे, डॉ.एन.वाय. साबळे, वसंतराव हरकळ, धनंजय साबळे, गुलाबराव साबळे,लक्ष्मण साबळे तुळशीदास खराटे,श दिपक सरोदे,रामेश्वर साबळे,दिपक साबळे,दत्तराव साबळे, उद्धव राऊत, हनुमान साबळे, भाऊराव साबळे सर,शेषराव साबळे, पिंटू आरू,सतीश मांडवगडे,विशाल साबळे,विष्णू साबळे यांचा विशेष सहभाग होता.या प्रशिक्षणाचे आयोजन कृषी देवता नैसर्गिक शेती मिशन शेतकरी गट, गोभणी यांनी केले. विशेष म्हणजे, गोभणी गावातील शेतकरी हळद पिकाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतात. यासंदर्भात तज्ञ प्रशिक्षक .संजय मांडवगडे यांनी शेतकऱ्यांना हळद पिकावर विशेष मार्गदर्शन केले. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी



शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतातील बांधावर जैविक निविष्ठा कमी खर्चात तयार करावी, यामुळे जमिनीची सुपीकता वाढेल व सूक्ष्म अन्नद्रवे सहज पिकाला उपलब्ध होतील या जैविक निविष्ठा चां वापर योग्य प्रमाणात केला तर शेतीचा खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होईल असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच कार्यक्रमादरम्यान माननीय प्रकल्प संचालक आत्मा श्रीमती अनिसा महाबळे मॅडम यांनी शेतकऱ्यांशी हितगुज करत “महाविस्तार अप” विषयी सविस्तर माहिती दिली. या अपच्या मदतीने शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, विविध योजनांची माहिती, तसेच कृषी क्षेत्रातील ताज्या घडामोडी सहज उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आधुनिक तंत्रज्ञान व नैसर्गिक पद्धतीचा अवलंब करून शेतकरी अधिक सक्षम व आत्मनिर्भर होण्यास निश्चितच मदत होणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला तसेच चिया पिकाबदल मार्गदर्शन केले व चिया पुस्तकाचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दुर्गादास खोडवे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री संदीप मोरे यांनी केले.

## संपादकीय

# धार्मिक सलोखा आणि सामाजिक जबाबदारी

देशात सध्या 'आय लव मोहम्मद' ही मोहीम गाजत आहे. ही मोहीम उत्तर प्रदेशातील कानपूर येथे सुरू झाली, जिथे पोलिसांनी अशा पोस्टर्सवर एफआयआर नोंदवल्याने मुस्लिम समाजात असंतोष पसरला. यामुळे देशभरात चर्चा सुरू झाली आणि काही ठिकाणी तणाव निर्माण झाला. उत्तर प्रदेशात दंगलसदृश्य परिस्थिती उद्भवली, तर महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) येथे रस्त्यावर काढलेल्या 'आय लव मोहम्मद' रांगोळीमुळे मुस्लिम समाज आक्रमक झाला. पोलिसांनी समजावून सांगितले तरी गर्दी मागे हटली नाही, परिणामी लाठीमार करावा लागला. गर्दीने पोलिसांवर दगडफेक केल्याच्या बातम्या आल्या, तसेच एका ग्रामीण तरुणावर टिळा लावलेला म्हणून हल्ला झाल्याची चर्चा आहे. शहरातील आमदार संग्राम जगताप यांच्या कट्टर हिंदुत्ववादी भूमिकेमुळे हिंदू-मुस्लिम तणाव वाढला आहे. अशा घटनांमुळे धार्मिक अराजकता पसरण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, सामाजिक सलोखा राखणे हे शासन, प्रशासन आणि मुख्यतः पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. समाजाने या घटनांमधून काय धडा घ्यायला हवा? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची भूमिका कशी असावी? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. सामाजिक एकता ही देशाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे, आणि ती टिकवण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागणे गरजेचे आहे.समाजाने प्रथम धडा हा घ्यायला हवा की, धार्मिक भावना अतिसंवेदनशील असतात. 'आय लव मोहम्मद' ही मोहीम मूलतः एखाद्या धार्मिक व्यक्तिमत्त्वावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी असली तरी, ती इतरांच्या भावनांना ठेच पोहोचवू शकते. उदाहरणार्थ, अहिल्यानगरमधील रांगोळीमुळे मुस्लिम समाजात असंतोष निर्माण झाला, कारण त्यांना ते अपमानास्पद वाटले.

यातून शिकायचे म्हणजे, सार्वजनिक ठिकाणी अशा घोषणा किंवा चिन्हे प्रदर्शित करताना इतर समाजाच्या भावनांचा विचार करावा. हिंदू, मुस्लिम किंवा इतर कोणत्याही समाजाने आपल्या धार्मिक अभिव्यक्तीला मर्यादा घालाव्यात, जेणेकरून त्या विभाजक ठरू नयेत. सोशल मीडियावर ट्रेंड चालवताना अफवा पसरवणे टाळावे. अनेकदा, छोट्या घटनेला धार्मिक रंग देऊन हिंसा भडकवली जाते. समाजाने अफवांना बळी न पडता, सत्याची शहानिशा करावी. शिक्षण आणि जागरूकता मोहिमांद्वारे धार्मिक सहिष्णुता शिकवली जावी, जसे की शाळांमध्ये विविध धर्मांच्या आदरावर आधारित अभ्यासक्रम राबवावा.दुसरा महत्त्वाचा धडा म्हणजे, हिंसा कधीच समस्येचे निराकरण करत नाही. अहिल्यानगरमध्ये दगडफेक आणि लाठीमार झाल्याने केवळ तणाव वाढला, आणि निर्दोष लोकांना त्रास झाला.

समाजाने शांततामय मार्गाने असंतोष व्यक्त करावा, जसे की चर्चा, निवेदने किंवा न्यायालयीन मार्ग. धार्मिक नेत्यांनीही जबाबदारीने वागावे. मुस्लिम समाजातील काही नेत्यांनी या मोहिमेला पाठिंबा दिला, पण त्यामुळे हिंदू समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. दोन्ही बाजूंनी संयम बाळगावा. युवकांनी सोशल मीडियावर धार्मिक वैमनस्य पसरवणाऱ्या पोस्ट टाळाव्यात. सरकारी आणि स्वयंसेवी संस्थांनी संवाद सत्रे आयोजित करावीत, ज्यात विविध समाजातील लोक एकत्र येऊन मतभेद दूर करू शकतील.लोकप्रतिनिधींची भूमिका यात निर्णायक आहे. आमदार संग्राम जगताप यांच्यासारख्या नेत्यांनी कट्टर भूमिका घेण्याऐवजी एकता वाढवण्यावर भर द्यावा. लोकप्रतिनिधींनी धार्मिक नेत्यांशी चर्चा करून तणाव कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा. ते पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन समाजाच्या हितासाठी काम करावेत. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशातील नेत्यांनी या मोहिमेवरून निर्माण झालेल्या तणावात मध्यस्थी करावी. लोकप्रतिनिधींनी कायद्याचे पालन करवावे आणि अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाईची मागणी करावी. ते स्वतः उदाहरण घालून द्यावेत – जसे की संयुक्त सभांमध्ये भाग घेणे किंवा शांतता मार्च काढणे.प्रशासनाची भूमिका ही निष्पक्ष आणि तत्पर असावी. पोलिसांनी अहिल्यानगरसारख्या घटनांमध्ये त्वरित हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली, पण त्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाय करावेत. प्रशासनाने धार्मिक नेत्यांसोबत बैठक घेऊन संभाव्य तणाव ओळखावा. सोशल मीडियावर नजर ठेवून वैमनस्य पसरवणाऱ्या अकाउंट्सवर कारवाई करावी. शासनाने धार्मिक सलोखा मोहिमा राबवाव्यात, ज्यात विविध धर्मांच्या सणांना एकत्र साजरे करण्यावर भर द्यावा. पोलिसांनी लाठीमार किंवा दगडफेक टाळण्यासाठी गर्दी नियंत्रणाचे प्रशिक्षण घ्यावे आणि मानवी हक्कांचा आदर करावा. मुख्य म्हणजे, प्रशासनाने दोन्ही समाजांना विश्वासात घ्यावे, जेणेकरून ते पक्षपाती वाटणार नाही.शेवटी, अशा घटनांमधून समाजाने सहिष्णुता आणि एकतेचा धडा घ्यावा. भारत हा विविधतेचा देश आहे, आणि ती विविधता टिकवण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारी उचलावी. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने विभाजक नव्हे, एकत्रित करणारी भूमिका बजावावी. शांतता हीच खरी शक्ती आहे. अन्यथा, छोट्या ट्रेंडमुळे मोठी अराजकता पसरेल, आणि देशाच्या प्रगतीला खीळ बसेल. सर्वांनी मिळून सामाजिक सलोखा राखूया – हाच खरा संदेश आहे.

# बदलापूर पूर्व पोलीस स्टेशन मधील महिला पोलिस कर्मचारी जनजागृती सेवा संस्थेच्या"नवदुर्गा सन्मानपत्राने" सन्मानित

बदलापूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) ॐसर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधके|शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते||नारी तू नारायणी...नारी तू सबला... तुझ्या तेजाने उजळे सृष्टी, नमिती आम्ही तुजला... स्त्री ही शक्ती आहे, श्रध्दा आहे, संस्कार आहे.महाराष्ट्रातील महिला पोलिस कर्मचारी सुध्दा घर संसार, मुलांचे संगोपन, शैक्षणिक उन्नती सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या संभाळून पोलिस विभागातील ही महिला त्याच तप्तरतेने, कर्तव्यदक्ष-कर्तव्यनिष्ठेने आपली सेवा देत असते.अशा महिलांचा सन्मान व्हावा म्हणून नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने बदलापूर पूर्व पोलीस स्टेशन येथील महिला पोलिसांचा भेट वस्तू व आकर्षक"नवदुर्गा सन्मानपत्र" प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी बदलापूर पूर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन पाटील, पोलीस निरीक्षक राजेश गज्जल समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी पोलीस निरीक्षक राजेश गज्जल यांनी संस्थेच्या कार्याचे व महिला पोलिस कर्मचाऱ्यांचा नवदुर्गा सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय हिंदू महासभेच्या संघटक सुवर्णा इसवलकर, रायझिंग स्टार नर्सरी प्रायमरी स्कूलच्या प्रिन्सिपल, समाजसेविका ममता मसुरकर, सेवा निवृत्त पोलिस अधिकारी दिलीप शिरसाठ,उमेद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुहास सावंत, सिटीझन वेल्फेअर असोसिएशनचे सचिव राजेंद्र नरसाळे, अन्टीपायरसी सेल मुंबईचे मुख्य तपासी अधिकारी आणि संस्थेचे जेष्ठ सल्लागार रामजित(जीतू) गुप्ता, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांचे कर्तृत्वदक्ष रायटर विष्णू मिरकले सर उपस्थित होते.सर्व प्रमुख पाहुण्यांचे संस्थेच्या वतीने शाल व उत्कृष्ट वाचनिय पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन, प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलिस अधिकारी विष्णू मिरकले, संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर, गंधाली तिरपणकर यांनी विशेष परिश्रम घेतले.महिला पोलीसांचा हा नवदुर्गा सन्मानपत्र वितरण सोहळा बदलापूर पूर्व पोलीस स्टेशन येथील कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



# वाशिम मध्ये बंजारा समाजाचा एस.टी.आरक्षणासाठी विराट मोर्चा.

## मोर्चा युवक,युवती,महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी




वाशिम (प्रवीण पट्टेबहादुर) सकल गोर बंजारा समाजाच्या माध्यमातून 29 सप्टेंबर रोजी वाशीम येथे एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी भव्य महामोर्चा निघाला.या मोर्चाची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातून करण्यात आली.हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.गोर बंजारा एसटी आरक्षण कृती समिती वाशिम यांनी निश्चित केली आहे. की गोर बंजारा समाजाच्या माहितीप्रमाणे लाखोंच्या संख्येने समाज मोर्चासाठी एकत्र आला होता.मोर्च्याची मुख्य मागणी ही होती की, बंजारा समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्यासाठी हैदराबाद नुसार योग्य आरक्षण मिळावे अशी आहे. मोर्चात बंजारा समाजाचा पारंपारिक पेहराव आणि सिंधू संस्कृती सह बोलीभाषेचा देखील जिवंत अनुभव यावेळी पहावयास मिळाला.बंजारा समाज आधुनिक काळात देखील त्यांच्या रुढी,प्रथा,परंपरा जतन करत असल्याचे दिसून आले 75 वर्षापासून बंजारा समाजावर अनुसूचित जमातीच्या निकषानुसार योग्य आरक्षण दिले गेलेले नसल्यामुळे हा भव्य मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काढण्यात आला मराठा समाजाला हैदराबाद गॅजेटनुसार आरक्षण मिळाल्याने बंजारा समाज जागृत झाला.असून संपूर्ण महाराष्ट्रभर हा समाज अनुसूचित जमातीसाठी रस्त्यावर उतरला आहे यासाठी बंजारा समाजाने आज जिल्हाधिकारी यांच्या सह शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सकल गोर बंजारा आरक्षण कृती समितीच्या वतीने व सर्व समाज बांधवांच्या वतीने विशाल मोर्चा काढण्यात आला व शासनाचे या मोर्चाच्या माध्यमातून लक्ष वेधले.हा विशाल मोर्चा अत्यंत शिस्तीने व शांततेने जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला.या मोर्चात युवक,युवती,महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पेडगाव येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन व दुर्गा उत्सव दोन्ही सन एकात्मतेने साजरे करणार.

## पेडगाव येथील ग्रामस्थांचा समतेचा निर्णय

वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) मंगरूळपीर तालुक्यातील पेडगांवातील दोन्हीही मंडळाची ठाणेदार किशोर शेळके यांनी बैठक घेऊन स्तुती केली आहे. शेळके म्हणाले की, माझ्या आयुष्यात पाहिलं गाव असे पहिल्यादा पाहले जिथे दोन गटात वाद होऊनही सुद्धा एका ठिकाणी आले ही बाब म्हणजे आदर्शाची आहे प्रत्येक गावा गावात संदेश देण्या सारखा आहे. म्हणूनच गावाला आदर्शाचा संदेश देत पेडगांव या गावातील आंबेडकर नवयुक मंडळ व दुर्गा उत्सव मंडळ यांनी एक निर्णय घेतला की,गावातील सर्व सण व उत्सव सारे एका गुण्या गोविदाने व एकात्मतेने साजरे करू असे दोन्हीही मंडळानी यावेळी सांगितले.मागील वर्षी दुर्गा देवी विसर्जच्या दिवशी वाद झाला होता.तो वाद जातीवादातून नसून काही लहान मुलामुळे घडला होता असे दिसून आले. तो गावात अनावधनाने झाला.हे सिद्द झाल त्या वादामध्ये जे झाले होते त्याला कुठलाही आधार नव्हता .हे प्रतिष्टीत लोकांच्या लक्ष्यात आल्यामुळे एकतमता गावात पुन्हा रुजली व शांतता नांदत आहे.आणि यापुढे सर्व सण व जयंती उत्सव सार्वजनिक कार्यक्रम साजरे करू असा निर्णय दोन्हीही मंडळाच्या सहकार्याने होतील असे सांगण्यात आले आहे यावेळी आंबेडकर नव युवक मंडळ अध्यक्ष जगदीश दंदे

व नव दुर्गा मंडळ अध्यक्ष राजू इंगोले यांनी घेतला व दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी या आरती च्या माध्यमातून संदेश पत्रकार विश्वास कुटे यांनी दिला.

आणि करूणेचा संदेश किंवा करुनेचा झरा म्हणजे प्रेम आणि दया आम्ही पेडगांवत प्रत्येक घराघरा पर्यत पोहचऊ असे यावेळी सांगितले.व समस्त गावकऱ्यांनी समतेचा निर्णय घेतला असल्याची सांगितले.



# लाखनीसह जिल्ह्याला दिलासा! स्थानिक गुन्हे शाखेने पकडले अट्टल चोर, ८.९० लाखांचा मुद्देमाल जप्त करत ९ गुन्हे उघडकीस

प्रतिनिधि / हंसराज भंडारा

भंडारा, : भंडारा जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरवत स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) दोन अट्टल घरफोडी चोरांना जेरबंद करण्यात मोठे यश मिळवले आहे. अनिल चून्नीलाल बोरकर (वय ३८, रा. लाखनी) आणि अक्षय दिनेश गुप्ता (वय २४, रा. लाखनी) अशी या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून घरफोडीचे ९ गुन्हे उघडकीस आणत एकूण ८,९०,५००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक पोलिसांना अनिल बोरकर आणि अक्षय गुप्ता यांच्या संशयास्पद हालचालींची गुप्त माहिती मिळाली होती. हे दोघे लाखनी परिसरात झालेल्या चोऱ्या आणि घरफोड्यांमध्ये सामील असल्याचा संशय होता आणि ते आपला गुन्हेगारी माल विकण्यासाठी सोनार गल्ली, लाखनी येथे जात असल्याची खात्रीशीर माहिती होती. या माहितीनंतर स.पो.नि. विवेक सोनवणे यांनी तात्काळ एक सुनियोजित योजना आखली. त्यांच्या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पो.हवा. ४३/डाहारे, पो.हवा. ८५४/देशमुख, पो.ना. १३३/ भीत्रे , पो.शि. १४९२/देशमुख, पो.शि. ७६१/ठाकरे आणि चालक पो.शि. ७१९/गजभीये यांचा समावेश होता. हे पथक सोनार गल्लीच्या वळणावर पोहोचले असता, त्यांना मोटारसायकलवरून येणारे दोन इसम दिसले. त्यापैकी एक अनिल बोरकर आणि दुसरा अक्षय गुप्ता होता. दोन्ही आरोपींची ओळख पटल्यानंतर पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी धैर्याने आणि दृढनिश्चयाने त्यांचा पाठलाग केला आणि अखेर त्यांना पकडण्यात यश मिळवले. अटकेनंतर पोलिसांनी दोन्ही आरोपींची कसून चौकशी केली असता, त्यांच्याकडून जप्त केलेल्या वस्तू संघटित गुन्हेगारीकडे निर्देश करत होत्या. अनिल बोरकर आणि अक्षय गुप्ता यांच्या ताब्यातुन ७०.३ ग्रॅम वजनाच्या ६ सोन्याच्या लगडी (किंमत ७,३०,०००/- रु.), चांदीचे तीन जोड तोडे, चांदीची पायल, एक चांदीची चेन, चांदीचे १० शिक्के, तीन चांदीच्या अंगठ्या, दोन जोडी बिछवे (किंमत २०,०००/- रु.), एक मोटारसायकल (किंमत १,००,०००/- रु.), २ मोबाईल फोन (किंमत १६,०००/- रु.), बनावट नंबर प्लेट, पेचकस, टॉमी व नगदी ५६,०००/- रु. असा एकूण ८,९०,५००/- रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. चौकशीदरम्यान, दोन्ही आरोपींनी मागील तीन ते चार महिन्यांत भंडारा जिल्हा, वारासिवनी (मध्य प्रदेश) आणि यवतमाळ येथे घरफोड्या केल्याचे कबूल केले. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाखनी, साकोली, सिहोरा, यवतमाळ व वारासिवनी (म.प्र.) येथील खालील ९ गुन्हे उघडकीस आले आहेतः पो.स्टे. लाखनी अप.क्र. ३२७/२०२५ पो.स्टे. सिहोरा अप.क्र. १९६/२०२५ पो.स्टे. साकोली अप.क्र. ५०५/२०२५ पो.स्टे. साकोली अप.क्र. ५११/२०२५ पो.स्टे.



लाखनी अप.क्र. ३८२/२०२५ पो.स्टे. सिहोरा अप.क्र. २४७/२०२५ पो.स्टे. अवधूतवाडी (यवतमाळ) अप.क्र. १३१४/२०२५ पो.स्टे. वारासिवनी (म.प्र.) अप.क्र. ५१७/२०२५ पो.स्टे. वारासिवनी (म.प्र.) अप.क्र. ५१८/२०२५ या कारवाईमुळे एकूण ८,९०,५००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अनेक घरफोडी प्रकरणांना वाचा फुटली आहे. पोलीस अधीक्षक नुरुल हसन आणि अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा भंडारा येथील पी.नि. नितीन चिचोळकर, स.पो.नि. विवेक सोनवणे, पो.हवा. प्रदीप डाहारे, पो.हवा. सतीश देशमुख, पो.शि. सचिन देशमुख, पो.शि. शुभम् ठाकरे, पो.ना. आशिष तिवाटे व पो.शि. कौशिक गजभीये यांच्या कर्तव्यदक्षतेमुळे दोन्ही अट्टल गुन्हेगारांना अटक करण्यात यश आले आहे.


महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)
१ २ ३ ४ ५ ६

# राज्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा

## अतिवृष्टी, पूरपरिस्थितीमुळे परीक्षा अर्ज भरण्यास २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिक्षणमंत्र्यांना निर्देश

मुंबई, : राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास अडचण येत असल्याने त्याला दि. २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले होते. राज्यातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना परीक्षा अर्ज भरण्याची आज दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी शेवटची मुदत आहे. मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आणि राज्यात होत असलेली अतिवृष्टिमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी, पालकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना संपर्क करून अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शिक्षण मंत्री भुसे यांना बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत निर्णय घेण्यास सांगितले. शिक्षण मंत्र्यांनी लगेचच राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क केला आणि अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचे निर्देशही दिले. त्यानुसार शिक्षण विभागामार्फत २० ऑक्टोबर पर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया करण्यात आली. त्याचबरोबर बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखील अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे तसेच नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे.



### वाशिम येथे फुले शाहू आंबेडकर पतसंस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी,आदर्श शिक्षक व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार व वार्षिक आमसभा संपन्न.

पतसंस्थेच्या वतीने आकर्षक सन्मानचिन्ह शाल,श्रीफळ देऊन केला मान्यवरांचा सन्मान

वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) स्थानिक येथील नि .कृ. गोटे सभागृहात फुले शाहू आंबेडकर जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित वाशिम च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम आदर्श शिक्षक व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ व वार्षिक आमसभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फुले शाहू आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर मंचावरील प्रमुख अतिथी यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर मुख्य सत्कार समारंभ कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी आदर्श शिक्षक राजू सरतापे,राज्य आदर्श शिक्षक डीगंबर घोडके यांचा सन्मान झाला तर. केशव वैद्य यांची राज्य कार्यकारिणी सहसचिव निवड झाल्याबद्दल गौरव करण्यात आला.संतोष पट्टेबहादुर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार झाला.सुभाष सरतापे जिल्हा सरचिटणीस म्हणून गौरव केला. त्यानंतर द रियल हिरो संघटना अध्यक्ष सहदेव चंद्रशेखर यांचा सन्मान केला.यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी सौ.सुनिता अंभोरे, श्यामराव गवई इंगळे,दादाराव राख,वसंता पांढरे,श्रीकृष्ण कड मोहन सरनाईक.यांना शाल पुष्पगुच्छ व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यानंतर संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कांबळे यांनी फुले शाहू आंबेडकर पतसंस्थेच्या वाटचालीबद्दल व केलेल्या कामगिरीबद्दल त्यांनी वार्षिक आढावा सविस्तर आमसभेमधे दिला. यावेळी या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कांबळे उपाध्यक्ष प्रवीण बंधारे, सचिव संजय वाकुडकर, पतसंस्थेचे संचालक गजानन नरवाडे,दिगंबर करवते, प्रभू मोरे गजानन इंगोले,सौ वंदना साबळे,सौ वंदना इंगळे हे सर्व संचालक उपस्थित होते. यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक संतोष पट्टेबहादूर सुभाष सरतापे यांनी केले तर उपस्थित आमचे आभार संचालक गजानन नरवाडे यांनी मानले.




# माहूरगडावर बरबड्याच्या कलाकारांचा सांस्कृतिक कलाविष्कार..

महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे
तालुका प्रतिनिधी माहूर

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या माहूर गडावर काल रविवार (दि.28) रोजी रेणुका मातेच्या चरणी शारदीय नवरात्र महोत्सवात बरबडा येथील कलाकारांनी सांस्कृतिक कलाविष्कार सादर केला.यात अभंग,भक्तिगीते,गोंधळ एका पेक्षा एक सरस गीते गाऊन उपस्थित रसिकांची दाद मिळवली. माहूरगड येथे नवरात्रोत्सवादरम्यान विविध सांस्कृतिक कलाविष्कार सादर केले जातात, ज्यात गायन, वादन, नृत्य आणि कविसंमेलन यांसारख्या कार्यक्रमांचा समावेश असतो. महाराष्ट्रातील हे एक महत्त्वाचे शक्तिपीठ असून, या काळात महाराष्ट्रातील विविध कलावंत आपली कला सादर करण्यासाठी येतात. नवरात्रोत्सवात नऊ दिवस या ठिकाणी सांस्कृतिक कलाविष्काराचा कार्यक्रम सादर केला जातो.सकाळी सनई वादनाने या कार्यक्रमाची सुरुवात होते आणि दिवसभर या कार्यक्रमाची रेलचेल असते. यंदा नायगाव तालुक्यातील बरबडा येथील कलावंताने देखील माहूर गडावर आपली संगीत सेवा दिली. प्रारंभी तुझं मागतो मी आता या गीताने सलोनी सुक्ते यांनी सुरुवात करत वातावरण भक्तिमय केले.नाम गाऊ नाम गाऊ नाम विठोबाला वाहू,अलौकिक दत्तात्रेय अवतार या संतोष गुरुजी पचलिंग यांनी गायलेल्या गीतांनी उपस्थित भक्त मंडळींची मने जिंकली.अंबाबाई लाड लाड ये ग या गोंधळी गीताने सौ.प्रेमला शेवाळे व कृतार्थ करण्या जन्म आपुला या शिवाजी गुरुजी शेवाळे यांनी गायलेल्या गीताने उपस्थितांची दाद मिळवली.महिषासुर मर्दिनी स्त्रोत स्वरांजली जाधव हिने गायले. शेवटी हलगी वाजती हे अजय शेवाळे यांनी गायलेल्या गीतावर सर्वांनी ठेका धरला. यात अजून भर ढोलकीवर असलेल्या समाधान राऊत आणि तबल्यावर असलेल्या परमानंद जाधव यांनी घातली.या गीताच्या जबरदस्त जुगलबंदीने उपस्थित भक्तांनी टाळ्यांचा



कडकडाट केला. या संगीत सेवेत प्रसिद्ध गायिका सलोनी सुक्ते,गायक संतोष गुरुजी पचलिंग,शिवाजी गुरुजी शेवाळे,स्वरांजली जाधव,सौ.प्रेमला शेवाळे, कीबोर्ड वर साथ अजय शेवाळे, तबला साथ परमानंद जाधव, ढोलकी समाधान राऊत,पखवाज व्यंकटी शेवाळे, टाळ भगवान शेवाळे आदींनी संगीत सेवा केली तर यावेळी श्रीमती पुष्पा करंजे, सौ.द्वारका कुंभारगावे, सौ रेखा पचलिंग, सौ.छाया शेवाळे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच उत्कृष्ट सूत्रसंचलन दीपा यमुनवार यांनी केले.शेवटी रेणुका माता मंदिर संस्थानचे पुजारी चंद्रकांत भोपी यांनी संस्थांनच्या वतीने सर्व कलाकारांना प्रमाणपत्र,शाल,श्रीफळ देऊन यथोचित सन्मान केला.

## छेडछाडीच्या संशयावरून शेळगाव (नृसिंह) येथे तरुणाची निर्घृण हत्या

## अल्पवयीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात; देगलूर तालुक्यात खळबळ

देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने

देगलूर तालुक्यातील शेळगाव (नृसिंह) येथे रविवारी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेत २८ वर्षीय तरुणाचा एका अल्पवयीन मुलाने धारदार चाकूने गळ्यावर व पाठिवर वार करून खून केल्याने परिसरात भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या हत्येमुळे गावात खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपीला तात्काळ ताब्यात घेतले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २८ सप्टेंबर) रात्री साडे आठच्या सुमारास संतोष परमेश्वर माटलवार (वय २८, रा. शेळगाव) हा आपला भाऊ व दोन मित्रांसोबत ग्रामपंचायत जवळील घराजवळ ओट्यावर बसून गप्पा मारत होता. दरम्यान, गावातील अल्पवयीन मुलगा (वय १६) तेथे येऊन “माझ्या बहिणीच्या पाठीमागे लागू नको” असा जाब देत संतोषवर संताप व्यक्त करू लागला. पूर्वीही या संशयावरून त्यांच्यात वाद झाले होते. त्याच रागातून अल्पवयीन आरोपीने कमरेला खोचलेला धारदार चाकू काढून संतोषच्या गळ्यावर व पाठिवर जबर वार केला.

या प्राणघातक हल्ल्यात संतोष रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. त्याला तातडीने देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला मृत घोषित केले.

या प्रकरणी मयताचा भाऊ अर्जुन माटलवार (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून देगलूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४७८/२०२५, कलम १०३ (१) भारतीय न्याय संहिता अंतर्गत नोंदविण्यात आला आहे. घटनेनंतर उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी व पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी घटनास्थळी पाहणी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड करीत आहेत.

या निर्घृण हत्येमुळे देगलूर तालुक्यात संताप व भीतीचे वातावरण पसरले आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटरचे थाटात उद्घाटनः बहुजन विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शनाचा शुभारंभ.

प्रतिनिधि / हंसराज भंडारा.

भंडारा,:- 27 सप्टेंबर शनिवार रोजी नमो बुद्धाय विहार, टाकळी, भगतसिंग वॉर्ड, भंडारा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटर (फाउंडेशन कोर्स बॅच) चे थाटात उद्घाटन करण्यात आले. या सेंटरच्या माध्यमातून बहुजन वर्गातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा आणि रोजगाराच्या संधींबाबत मोफत मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील जेएनयू विद्यापीठातील सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटरचे संचालक, डॉ. राहुल सोनपिंपळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनवंताताई बोरकर होत्या. श्रीराम गणेर, विजय सावध, डॉ. रतनकुमार गेडाम आणि आकाश हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. राहुल सोनपिंपळे यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसमोरील आव्हानांवर प्रकाश टाकला. "आज बहुजन वर्गातील विद्यार्थी काय करावे आणि काय करू नये या मानसिकतेत असल्यामुळे रोजगाराच्या संधींपासून दूर आहे. कोणते शिक्षण घ्यावे आणि कोणते नाही यासंदर्भात सविस्तर आणि मोफत मार्गदर्शन करण्यासाठी भंडारा शहरात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटरची स्थापना करण्यात आली आहे," असे ते म्हणाले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांसारख्या महामानवांच्या विचारांना उजाळा दिला. "त्यांचे शिक्षणाचे विचारच आपल्या सर्वांना तारणार आहेत आणि त्याशिवाय आपली प्रगती होणार नाही, कारण आज आपल्या देशात बहुजन वर्गाचे शिक्षण कमी होत चालले आहे," असे त्यांनी नमूद केले. भविष्यात बेरोजगारीची झळ बहुजन वर्गाला बसल्यास त्याचा





सामना करणे कठीण होईल, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना देशातील नामवंत विद्यापीठांमधून वेगवेगळे अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्रा. डॉ. युवराज खोब्रागडे यांनी मार्गदर्शन करताना शिक्षणासंदर्भात काल, आज आणि उद्याच्या परिणामांची जाणीव करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या संदेशाची आठवण करून देत, त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या घरांच्या भिंतींवर "तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायची आहे" असे लिहून ठेवण्याचे आवाहन केले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आपले भविष्य उज्ज्वल करण्यासाठी कठोर मेहनत घ्यावी आणि आपले नावलौकिक करावे, असे प्रतिपादन त्यांनी केले. या रिसर्च सेंटरच्या यशस्वी आयोजनासाठी अड. सोनिया डोंगरे, नितेश बोरकर, अश्विनी डोंगरे, धनंजय देशकर, अमित रामटेके, आर्या लोणारे, राकेश बोरकर, रुपाली लोणारे, सुनीता डोंगरे आणि आम्रपाली महिला मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी विहार समितीमधील पदाधिकारी आणि बहुजन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## विद्यार्थ्यांना आधार कार्ड अद्यावतीकरणासाठी शाळांमध्ये कॅम्प लावा.

### मनसे विद्यार्थी सेनेची शिक्षणाधिकारी यांच्याकडे मागणी

वाशिम (प्रतिनिधी)शालेय विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड मध्ये काही त्रुटी असल्यास शाळेने त्यांना आधार कार्ड अद्यावत करण्याचे निर्देश दिले आहे. जी अत्यंत महत्त्वाचे आहे परंतु आधार केंद्रावर प्रचंड गर्दी असल्यामुळे विद्यार्थ्यांना तिथेच संपूर्ण दिवस लागत आहे.त्यामुळे त्यांचे शालेय अभ्यासाचे नुकसान होत आहे या समस्येचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना निवेदन देतानाच कळविले की प्रत्येक शाळेने किंवा जवळच्या दोन-तीन शाळांनी एकत्र येऊन शाळेच्या परिसरात आधार कार्ड अद्यावतीकरन करण्यासाठी कॅम्प आयोजित करावा यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचला आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होणार नाही. यात आपण मागे राबवलेल्या उपक्रमाप्रमाणे 'शासन आपल्या दारी' नसून विद्यार्थी शासनाच्या दारी असे झाले आहे.यामध्ये आपण आवश्यक असल्यास ते तू सुविधा वाढवावी परंतु विद्यार्थ्यांची




गैरसोय टाळावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष गजानन कढणे यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसि यांच्या मार्गदर्शनात मनसे जिल्हा सचिव तथा वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे यांच्या उपस्थितीत शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## कॅन्टोन्मेंट बोर्ड हॉस्पिटल प्रशासनाने रुग्णांची हेळसांड थांबवावी

### रिपाईचे शहर सरचिटणीस व आयटी सेलचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष महेंद्र सोनवणे यांची मागणी.

देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे

देवळाली कॅम्प शहरातील कॅन्टोन्मेंट बोर्ड हॉस्पिटल म्हणजे आजूबाजूच्या पंचक्रोशीतील सामान्य लोकांसाठी आरोग्य संजीवनी आहे.. हॉस्पिटल मध्ये येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला तिथे चांगली वागणूक दिली जाते, त्वरित उपचार केले जातात, येथील डॉक्टर बावस्कर, डॉक्टर शाहू पाटील, डॉक्टर दौलतानी, होनराव मॅडम आणि त्यांचा स्टाफ नर्सेस, वार्डबॉय, ब्रदर्स हे सर्व आलेल्या रुग्णाना चांगली सेवा देतात हे जरी खरे असले तरी काही विशिष्ट आजारासाठी स्पेशल डॉक्टरांची नेमणूक केली आहे. त्यामध्ये, हृदरोग तज्ञ, अस्तिरोग तज्ञ, बालरोग तज्ञ,होमिओपॅथीक, डोळ्याचे विकार, दातांचे विकार तज्ञ असे विविध आजारां साठी तज्ञ डॉक्टरांची नेमणूक केली आहे त्यासाठी डॉक्टरांना काही विशिष्ट वार ठरवून देण्यात आले आहेत, *प्रत्येक डॉक्टरचे एक प्रायव्हेट हॉस्पिटल आहे किंवा ते दुसऱ्या कोणत्यातरी मोठ्या हॉस्पिटल मध्ये सेवा देत आहेत.* आणि त्याच कारणाने *डॉक्टरांना जो वार ठरवून दिला आहे त्यादिवशी डॉक्टर वेळेवर येत नाहीत,* त्यांच्या प्रायव्हेट हॉस्पिटल मध्ये जर एखादे ऑपरेशन असेल त्यादिवशी डॉक्टर येत नाहीत त्यामुळे जे रुग्ण पैसे खर्चून आलेले असतात त्यांना परत जावे लागते, तसेच एखादा रुग्ण हात किंवा पाय फॅक्चर साठी आला तर डॉक्टर उपचार तर करतात



पण त्याला लागणारे प्लास्टरचे मटेरियल बाहेरून आणायला लावतात. आणि बाहेरच्या मेडिकल मध्ये आवाजवी किंमत असल्याने ते रुग्णाला परवडत नाही म्हणून ते प्लास्टरचे मटेरिअल वाजवी फी घेऊन हॉस्पिटलने रुग्णाला उपलब्ध करून द्यावे.

तसेच दातांचे डॉक्टर आहेत ते रुग्णाला चेक करतात परंतु गोळ्या बाहेरून लिहून देतात ते रुग्णाला परवडत नाही.तसेच दातामध्ये भरण्याचे सिमेंट उपलब्ध नाही म्हणून रुग्णाला प्रायव्हेट हॉस्पिटल मध्ये जावे लागते. यावर बोर्ड प्रशासनाने तसेच बोर्डाचे नामनिर्देशीत सदस्य सचिनजी ठाकरे यांनी तातडीने लक्ष घालून रुग्णांची होणारी हेळसांड थांबबावी अशी मागणी *रिपाईचे शहर सरचिटणीस व आयटी सेलचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष महेंद्र सोनवणे यांनी केली आहे..*

## अंधाराशी लढा देत नवापुरला उजेड देणारे अदृश्य हिरो

### सात तासांची झुंज – नवापूर वीज कर्मचाऱ्यांचे परिश्रम फळाला; वादळ, पाऊस, अंधार आणि प्रकाशाचा विजय

**नवापूर । प्रतिनिधी ।**

काल सायंकाळी सात वाजल्यानंतर नवापूर शहरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. या वादळामुळे झाडे कोसळली, फांद्या रस्त्यावर पडल्या, विजेच्या तारा तुटल्या व खांब वाकले. परिणामी संपूर्ण शहरातील वीज पुरवठा खंडित झाला.

वीज नसल्यामुळे नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागला. इन्व्हर्टर बंद पडले, पंखे ठप्प झाले, आणि घरात तापमान जास्त असल्याने नागरिक अक्षरशः त्रस्त झाले. रात्रभर "लाईट कधी येईल?" असा सवाल नागरिकांकडून सतत विचारला जात होता.



या परिस्थितीत वीज वितरण कंपनीचे कर्मचारी लगेच घटनास्थळी दाखल झाले. मुसळधार पाऊस आणि वाऱ्याचा सामना करत त्यांनी पडलेले खांब उभे केले, तुटलेल्या तारा जोडल्या आणि लाईन दुरुस्त केली. त्यांच्या सात तासांच्या अथक मेहनतीमुळे पहाटे दोन वाजता वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

नागरिकांनी कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. “शाब्बास नवापूर वीज वितरण कंपनीचे कर्मचाऱ्यांनो, अंधार दूर करून पुन्हा प्रकाश पेरलात,” अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. काही नागरिकांनी रस्त्यावर जाऊन थेट कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले, तर काहींनी त्यांच्या प्रयत्नांचा सोशल मीडियावर प्रसार करून आदर व्यक्त केला.

आपल्याकडूनही नागरिकांनी दिलेली प्रशंसा आणि प्रेम ऐकून कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. शहरातील प्रत्येक घरात दिवे लावले गेले, लोकांना दिवसभर कामे सुरळीत करता आली. या अपार परिश्रमामुळे नागरिकांना केवळ उजेडच मिळाला नाही तर संकटाच्या काळात एकत्र येण्याची आणि मदतीची जाणीव देखील झाली. नवापूरकरांनी दिलेल्या कृतज्ञतेतून स्पष्ट होते की, अशा संकटात वीज कर्मचाऱ्यांचा समर्पण आणि प्रयत्न खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहेत.

## कमलेश छत्रीवाला यांच्यावर भाजपची नवी जबाबदारी

**नवापूर । प्रतिनिधी ।**

भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेश महामंत्री विजय चौधरी तसेच जिल्हाध्यक्ष निलेश माळी यांच्या आदेशानुसार नवापूर तालुका ग्रामीण मंडळात महत्त्वपूर्ण नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.



यामध्ये नवापूर शहरातील कर्तबगार व निष्ठावान कार्यकर्ते कमलेश जयंतीलाल छत्रीवाला यांची भाजपा नवापूर ग्रामीण मंडळात सदस्य म्हणून निवड करण्यात आली. नियुक्तीपत्राचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. नियुक्तीपत्र भाजपा नवापूर विधानसभा प्रमुख अजय वसावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या वेळी भाजपाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी कमलेश छत्रीवाला यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि त्यांच्या कार्यतत्परतेचा गौरव केला. “कमलेशभाई यांच्या संघटन कौशल्यामुळे पक्षाला ग्रामीण भागात निश्चितच नवे बळ मिळेल,” असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

भाजपाच्या विविध उपक्रमात त्यांनी आतापर्यंत केलेल्या सक्रिय सहभागाची दखल घेऊन ही जबाबदारी देण्यात आल्याचे मानले जात आहे. सामाजिक कार्याची आवड आणि लोकसंपर्काची ताकद ही त्यांची जमेची बाजू असल्याचे मत स्थानिक नेत्यांनी व्यक्त केले.

नव्या जबाबदारीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना कमलेश छत्रीवाला म्हणाले की, “पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर दाखवलेला विश्वास ही मोठी जबाबदारी आहे. भारतीय जनता पार्टीची विचारधारा घराघरापर्यंत पोहोचवणे, पक्षसंघटना बळकट करणे आणि जनतेच्या सेवेसाठी सतत कार्यरत राहणे हेच माझे ध्येय आहे.”

या नियुक्तीमुळे नवापूर तालुक्यातील ग्रामीण भागात भाजपाची ताकद आणखी वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## लोहगाव वसमाने भागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ सानुग्रह अनुदान मिळावे

**शिंदखेडा । प्रतिनिधी ।**

गेल्या दोन दिवसापासून लोहगाव वसमाने या परिसरात शेतकऱ्यांच्या केळी व पपई पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नुकसान झालेल्या पिकांचा तात्काळ पंचनामा व्हावा व शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळावे यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना शेतातच बोलावून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले. आईचे निधन होऊन आठच दिवस झाले असले तरी दुःख बाजूला ठेवून शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामा करण्याचे केलेल्या आवाहनाला अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिल्यामुळे समाधान व्यक्त केले.

शनिवारी व रविवारी पहाटे लोहगाव वसमाने परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार अतिवृष्टी झाली. यात शेतकऱ्यांच्या केळी,पपई, ऊस, कापूस, मका पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उपजिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या



शेतावर जाऊन पाहणी केली. तात्काळ महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर पाहणी करून पंचनामे करण्याची विनंती केली. अधिकाऱ्यांनी देखील तात्काळ मंडळ अधिकारी व तलाठी यांना पाठवून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे केले. पंचनामे शासनाकडे पाठवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळसानुग्रह अनुदान मिळावे. तालुक्यातील इतर नुकसानग्रस्त भागात देखील पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत मिळावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी लोहगाव - वसमाने माजी सरपंच महेंद्र पाटील, दादाभाऊ पाटील, जगदीश पाटील, सतीश माळी, जगन्नाथ माळी, सुनील पाटील,मुरलीधर पाटील, राजेंद्र पाटील, चंद्रशेखर पाटील, ईश्वर माळी उपस्थित होते.

## गंगामाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत राज्यस्तरीय क्विझ स्पर्धा जल्लोषात

**धुळे । प्रतिनिधी ।**

गंगामाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नगांव येथे आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय क्विझ स्पर्धा २०२५ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या भव्य स्पर्धेत राज्यातील विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ज्ञान, बुद्धिमत्ता व तर्कशक्तीची खरी कसोटी पाहायला मिळाल्याने संपूर्ण परिसरात शैक्षणिक वातावरण उत्साहाने भरून गेले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव श्री मनोहर भदाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्राचार्य श्री एस. व्ही. चोरडिया,परीक्षक डॉ. मनोज जोगराणा,एस. व्ही के. एम. फार्मसी धुळे व डॉ. उमेश जोशी, अजमेरा कॉलेज ऑफ फार्मसी नगांव तसेच प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी



केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर स्पर्धात्मक उपक्रमांमधूनही स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्याची गरज असल्याचे सांगितले.

क्विझ स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी जलद गतीने विचार करून उत्तरे दिली. सामान्य ज्ञान, विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, चालू घडामोडी आणि तंत्रज्ञान या विविध क्षेत्रांतील प्रश्नांना उत्तरे देताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि अभ्यासू वृत्ती स्पष्ट जाणवली. स्पर्धेतील अंतिम फेरी अत्यंत रोमांचक ठरली. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या तयारीचे व सादरीकरणाचे विशेष कौतुक केले.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक 2000/- रुपये रोख,ट्रॉफी व प्रमाणपत्र हे आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, शिरपूर येथील विद्यार्थ्यांना तसेच द्वितीय पारितोषिक 1000/- रुपये रोख,ट्रॉफी व प्रमाणपत्र हे एस. व्ही. के. एम. फार्मसी, धुळे व तृतीय पारितोषिक 700/- रुपये रोख,ट्रॉफी व प्रमाणपत्र हे एच. आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, शिरपूर येथील विद्यार्थ्यांना मिळाले. तसेच उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून एस. व्ही. के. एम. फार्मसी, धुळे येथील विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानवृद्धीबरोबरच आत्मविश्वास, सहकार्यभावना आणि स्पर्धात्मकता विकसित झाल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास धुळे ग्रामीणचे लोकप्रिय आमदार तसेच संस्थेचे अध्यक्ष राम भदाणे,संस्थेचे सचिव मनोहर भदाणे, उपाध्यक्ष तथा नगांव येथील सरपंच ज्ञानज्योती भदाणे,प्राचार्य एस. व्ही. चोरडिया व डॉ. महंतेश यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान लाभले.

## वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने पिकांचे प्रचंड नुकसान, घरांची पडझड

### दोन दिवसात सात महसुल मंडळात १९२ मिलिमीटर पावसाची नोंद; हेक्टरी ५० हजार रुपयांची भरपाईची मागणी

**शिंदखेडा । प्रतिनिधी।**

**शहर व परिसरात शनिवारी व रविवारी पहाटेपर्यंत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने पिकांचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. केळी, पपई, मका, कापूस या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दोन दिवसात सात महसूल मंडळात १९२ मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद आहे.**





शहर व परिसरात पिकांच्या वाढीसाठी आवश्यक पाऊस वेळोवेळी झाला असला तरी जोरदार पावसाची प्रतीक्षा होती. गेल्या दोन दिवसात मुसळधार पावसाने हजेरी लावली. लोहगाव, कुंभारे, कदाणे, धांदरणे, अमराळे, मुकटी या या भागात झालेल्या अतिवृष्टी व वादळी वाऱ्याने शेतामध्ये अनेक ठिकाणी पाणी साचले व पिके जमीन दोस्त झाली आहेत.

तालुक्यातील लोहगां व कुंभारे येथे ग्यानाबाई गोविंदसिंग गिरासे गोविंदसिंग पौलतसिंग गिरासे यांच्या शेतातील केळी या पिकाचे नुकसान झालेले आहे. कदाणे येथे महेंद्र हिम्मतराव सोनवणे, धांदरणे येथे हरपाल गिरासे, अमराळे येथील गुलाब बोरसे, मुकटी येथील बाबुराव देसले यांच्या घरांचे भिंती व छत कोसळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी तात्काळ करावे अशा सूचना तहसीलदार संभाजी पाटील यांनी दिल्या आहेत.

लोहगाव, वसमाने, कळगाव, कुंभारे या परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने पपई, केळी, मका, कापूस, सोयाबीन, तूर ही पीकं पाण्याखाली गेली आहेत. शेतकऱ्यांची शेती जलमय झाली असून सोयाबीन पिकावर कोंब फुटल्याने पीक घरात येण्याची शक्यता संपुष्टात आली आहे. कपाशीचे बोंड, पात्या, फुले उन्मळून खाली पडली आहेत.शासनाने हेक्टरी 50 हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

तालुक्यातील सात मंडळात शनिवार व रविवारी पहाटेपर्यंत झालेला पाऊस--(कंसात मंडळात झालेला एकूण पाऊस)

1) शिंदखेडा ३० (४६९ मिमि.), नरडाणा २२ (४९० मिमि.), खलाणे २४ (४०१ मिमि.), चिमठाणे ४८ (४९६ मिमि.), वर्षी ३४ (४६८ मिमि.), बेटावद २५ (४७४ मिमि.), विरदेल ०९ (१५४.७ मिमि.)